# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI

8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001

Tele. No. - 022-22016157/53/59 Website -www.mahacet.org E-Mail-cetcell@mahacet.org


**क्र.: आस्था-1925/प्र.क्र.29/पदभरती/सेवानिवृत्त कंत्राटी-/District Nodal Officer/2025/** 3650 **दिनांक :** 26 DEC 2025

# जाहीर सूचना

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये स्थापन करण्यात येणाऱ्या **राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष विस्तार केंद्र (विद्यार्थी सहाय्यता केंद्र)** येथील कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे पदाकरिता शासनाने निर्धारित अटी व शर्तींनुसार **सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी** यांच्याकडून कंत्राटी तत्त्वावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदाचा तपशील**

| क्र. | पदाचे नाव | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | जिल्हा संपर्क अधिकारी<br>**(राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष विस्तार केंद्रांसाठी जिल्हानिहाय ४० पदे)** | ४० |

**अर्ज करण्यासाठी अटी व पात्रता:**

(१) कोणत्याही शाखेतील पदवीधर किंवा पदव्युत्तर पदवीधर असणे आवश्यक. संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे पुरेसे ज्ञान असणे गरजेचे. पदव्युत्तर पदवीधारकांना प्राधान्य.

(२) विविध व्यावसायिक (अभियान्त्रिक,उच्च, आयुष, वैदकीय, कला व कृषी) अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा प्रक्रिया (CET) आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) यांचे ज्ञान व अनुभव असलेल्यांना प्राधान्य.

(३) एम.एस. ऑफिस, स्कॅनिंग, प्रिंटिंग आणि मूलभूत डिजिटल/ पोर्टल ऑपरेशन्स, तसेच CET पोर्टलची माहिती असणे आवश्यक.

(४) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने निर्धारित केल्याप्रमाणे संबंधित अनुभव असलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना प्राधान्य.

(५) शासन सेवेतून गट-अ/गट-ब राजपत्रित पदावरून निवृत्त अधिकाऱ्यांना प्राधान्य. निवृत्तीच्या वेळी अथवा सध्या त्यांच्या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित नसावी.

(६) जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

(७) उत्कृष्ट संवाद, समन्वय आणि समुपदेशन कौशल्य आवश्यक.

(८) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांवर प्रभुत्व असणे आवश्यक.

(९) संबंधित जिल्ह्यात राहणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य. राहण्याची व जेवणाची कोणतीही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार नाही.

(१०) नियुक्ती पूर्णतः कंत्राटी स्वरूपाची असून कालावधी एक वर्षाचा राहील; तीन महिन्यांचा (संभाव्यकालावधी) (Probation) राहील. किमान सहा महिने सेवा आवश्यक असून सेवा करार वाढविणे, तसेच सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम अधिकार्यांचा राहील.

(११) अपवादात्मक परिस्थिती व सक्षम अधिकारी यांच्या मान्यतेशिवाय राजीनामा स्वीकारला जाणार नाही. वेतन व सेवा अटी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष ठरवेल.

**मुख्य जबाबदाऱ्या:**

(१) विद्यार्थ्यांना CET अभ्यासक्रम, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया, परीक्षा पद्धत व वेळापत्रक याबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे; CAP प्रक्रियेतील अर्ज भरणे, दस्तऐवज अपलोड करणे, शुल्क भरणा, पर्याय नोंदणी व अलॉटमेंटपर्यंत सर्व टप्प्यांत तांत्रिक सहाय्य करणे; फ्रंट डेस्कवर पोर्टल, लॉगिन, पेमेंट, दस्तऐवज अद्ययावत इत्यादी तांत्रिक समस्यांवर मार्गदर्शन करणे; विविध शिष्यवृत्तीबाबत माहिती देणे, तसेच विद्यार्थ्यांच्या आवड, क्षमता व संधी विचारात घेऊन अभ्यासक्रम-संस्था निवड, करिअर समुपदेशन, Predictive Counseling, Alternative Program Guidance आणि Course Mapping प्रदान करणे.

(२) केंद्रातील प्रशासकीय कामकाजाचे प्रभावी पर्यवेक्षण करणे आणि तांत्रिक मदतनीस, समुपदेशक व इतर कर्मचारी यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे.

(३) जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, परीक्षा केंद्रे आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यात आवश्यक समन्वय राखणे.

(४) विद्यार्थ्यांच्या शंका व तक्रारींची नोंद ठेवून त्यांचे निवारण करणे तसेच प्रलंबित तक्रारींसाठी संबंधित कार्यालयांशी समन्वय करणे.

(५) सीईटी कक्षाच्या निर्देशप्रमाणे निश्चित कालावधीनुसार मासिक व आवश्यक ते इतर अहवाल तयार करून सादर करणे.

**अर्ज करण्याची पद्धत:**

इच्छुक पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी दिनांक १० जानेवारी २०२६ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज व विवरणपत्र **est.cetcell@gmail.com** या ई-मेलवर पाठवावा. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. कोणत्याही पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. निवड मुलाखतीच्या आधारे केली जाईल व मुलाखत सीईटी कक्षाच्या मुंबई कार्यालयात घेतली जाईल; कोणताही प्रवासभत्ता देय राहणार नाही. निवडीबाबतचा अंतिम निर्णय सीईटी कक्षाच्या राहील.

नियुक्ती पूर्णतः तात्पुरती व सुरुवातीला एक वर्षापुरती मर्यादित राहील. काम असमाधानकारक आढळल्यास मा. आयुक्त यांच्या अनुमतीने एक महिन्याची नोटीस देऊन सेवा समाप्त केली जाऊ शकते.

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

022-22016153 / 57 / 59 (Ext.: 110)

**स्थळ:** मुंबई

Sd/-

**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**

सदस्य सचिव

प्रवेश नियामक प्राधिकरण तथा

आयुक्त व सक्षम प्राधिकारी,

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त राज्य शासकीय कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज.

**अर्जदाराने अलीकडील काळातील स्वत :चे छायाचित्र येथे चिकटवावे**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | ------------------------------------------ |
| २) | जन्म दिनांक व वय | | ----/----/------ |
| ३) | सेवानिवृत्त दिनांक | | ----/----/------ |
| ४) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | | ------------------------------------------ |
| ५) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाचे ग्रेड वेतन सातव्या/ वेतन आयोगानुसार वेतनस्तर | | ------------------------------------------ |
| ६) | सेवानिवृत्ती वेळेस कार्यरत असलेल्या विभागाचे नाव | | ------------------------------------------ |
| ७) | संबंधित प्रशासकीय विभाग | | ------------------------------------------ |
| ८) | अर्जदाराचा पत्ता | : | ------------------------------------------ |
| ९) | भ्रमणध्वनी क्रमांक | : | ------------------------------------------ |
| १०) | ईमेल | : | ------------------------------------------ |
| ११) | सेवेत असताना शिक्षा झालेली आहे का | : | ----/----/------ |
| १२) | आवश्यक असलेली अर्हता अर्जदारास आहे काय? | : | होय / नाही |
| १३) | अनुभव | : | ------------------------------------------ |

महाराष्ट्र अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियम) अधिनियम २०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षात निव्वळ कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी (जिल्हा संपर्क अधिकारी - राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष विस्तार केंद्रांसाठी) या पदाकरिता प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक : **अर्जदाराची स्वाक्षरी**

सहपत्रे : सर्व आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे

(टिप : उपरोक्त नमूद माहिती आवश्यक असल्याने संपूर्ण माहिती सादर करणे अनिवार्य आहे.)